जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.9819208279

प्रेसनोट **दिनांक ३०.०७.२०२५**

''रक्तदाब स्थिर ठेवण्यासाठी वापरले जाणारे तसेच मानवी शरिरास अपायकारक असलेल्या औषधांची बेकायदेशिर विक्री व साठा करणाऱ्या इसमांवर कारवाई ''

घटक-५,वागळे, गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सलील भोसले यांना गुप्त बातमीदारा मार्फत माहीती मिळाली की, वर्तकनगर भागामध्ये मंगेश नावाचा व्यक्ती हा **MEPHENTERMINE SULPHATE INJECTION IP** हे औषध परिशिष्ठ एच या प्रवर्गात मोडत असल्याचे माहीत असतांनाही तसेच ते वैद्यकिय अधिकारी, यांचे सल्ला अगर त्यांचे लेखी चिठ्ठीशिवाय अगर परवान्या शिवाय खरेदी विक्री करण्यास प्रतिबंध असतांना मानवी शरिरावर अपायकारक त्याच बरोबर रक्तदाब स्थिर ठेवला जावा या करीता नमुद औषधाची गैर मार्गाने आयात करुन त्याची शरिर सौष्ठव करण्याऱ्या व्यक्तींना बेकायदेशिरपणे विक्री करत आहे.

सदर माहीतीचे अनुषंगाने अन्न व औषध प्रशासन विभाग,ठाणे, महाराष्ट्र राज्य यांचेकडील अधिकारी यांचेशी समन्वय साधुन घटकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी मोठया शिताफिने सापळा आयोजन करुन विहांग गार्डन सोसायटी लगत वर्तकनगर ते वैतीवाडी जाणारे रोडवर, वर्तकनगर,ठाणे पश्चिम,या ठिकाणी दि.२९/०७/२०२५ रोजी २१.४५ वा.चे सुमारास इसम नामे मंगेश सदानंद परब, वय ३२ वर्षे, व्यवसाय-जिम ट्रेनर,रा.रुम नं.१३/अ श्रेयस सोसायटी, विजयनगर, वर्तकनगर,ठाणे यास ताब्यात घेतले सदर इसम **MEPHENTERMINE SULPHATE INJECTION IP** या औषधाच्या किंमत १,०७६०४/- रुपयांच्या एकुण २९० बाटल्यांचा साठा विनापरवाना बेकायदेशिरपणे विक्री करीता जवळ बाळगला असतांना मिळुण आला आहे. सदर बाबत वर्तकनगर पोस्टे गुन्हा नोंद क्रमांक ०६१६/२०२५,कलम १२५ भारतीय न्याय संहिता-२०२३ सह कलम १८(क) औषधी द्रव्य व सौंदर्य प्रसाधन अधिनियम १९४० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याचा तपास सपोनि श्री भुषण शिंदे, घटक-५ वागळे,गुन्हे शाखा हे करीत आहे.

सदरची कारवाई श्री.पंजाबराव उगले, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री.अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री.शेखर बागडे, सहाय्यक पोलीस आयुक्त (शोध-१) यांचे मार्गदर्शनाखाली घटक-५ वागळे, गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.सलील भोसले, श्रीमती जयश्री शिंदे, औषध निरीक्षक, ठाणे, सपोनि/श्री.भुषण शिंदे, पोहवा/जाधव, पोना/तेजस ठाणेकर, चापोअं/७५४ यश यादव या पथकाने केली आहे.

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर